प्रकरण २ रे

# अभ्यासाचा विषय.

## प्रकरण २ रे.

## अभ्यासाचा विषय

२.१ प्रौढ शिक्षणाच्या संशोधनाची गरज.

२.२ संशोधनाचे शीर्षक.

२.३ संशोधनाची उद्दिष्टे.

२.४ संशोधानाच्या मर्यादा व व्याप्ती.

२.५ संशोधनातील संज्ञांचा अर्थ.

## -: प्रकरण २ अभ्यासाचा विषय :-

### २.१ संशोधनाची गरज व महत्त्व :-

स्वतंत्र भारताने लोकशाही राज्य पध्दतीचा स्वीकार केलेला आहे. भारतातील लोकच या देशाचे मालक व राज्यकर्ते आहेत. राज्य करणारी बहुसंख्य जनता निरक्षर व अशिक्षित व अज्ञानी असेल तर देशातील अनेक समस्या हाताळण्याचा प्रयत्न व्यर्थ झाला असे होईल. भारतामधील निरक्षरता लक्षात येताच राज्यकर्त्यांचे लक्ष निरक्षरता निर्मूलनाकडे गेले. १९५१ मध्ये भारतातील साक्षरता प्रमाण १६.६ ٪ होते. १९६१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण २४ ٪ झाले. १९७१ मध्ये २९.४५٪ साक्षरतेचे प्रमाण झाले तर १९८१ मध्ये ३६٪ पर्यन्त गेले. साक्षरतेचे प्रमाण वाढले परंतु १९५१ मध्ये २४.६६ कोटी जनता निरक्षर होती तर १९८१ मध्ये ३४.३३ कोटी जनता निरक्षर राहिली. म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालांत निरक्षरांच्या संख्येतही वाढ होत गेली ही गोष्ट भयावह (गंभीर) आहे. साक्षर व सुशिक्षितानीच स्वातंत्र्याचा फायदा उठविला. काहींचे जीवनमान उंचावले, तर कांहींचे कमी झाले. लोकसंख्या वाढली, अनेक सामाजिक व राजकीय प्रश्न निर्माण झाले व होत आहेत. या सर्व प्रश्नांचे मूळ निरक्षरतेत आहे. ही गोष्ट विचारवंतासह सर्वांना आता मान्य आहे.[१ व २]

प्रौढ शिक्षण योजना ही सर्वसामान्य गोरगरीब, बहुजन समाजाच्या उत्थानाची योजना आहे. पिढयान्‌पिढया ही मंडळी शिक्षणापासून दूर आहेत. शिक्षणाचा प्रकाश ज्यांच्यापर्यन्त पोहोंचला नाही, त्यांच्यासाठी प्रौढ शिक्षण योजना आहे. यापूर्वी साक्षरता मोहीम, निरक्षरता निर्मूलन मोहीम, जन आंदोलन, ग्राम गौरव, ग्राम साक्षर मोहीम, अशा विविध नावांनी हा कार्यक्रम वेळोवेळी विविध स्वरूपात राबविला गेला.

२ ऑक्टोबर १९७८ पासून राष्ट्रीय स्तरावर भारत सरकारने हा कार्यक्रम नव्याने व्यापक स्तरावर सुरू केला. या कार्यक्रमाची रूपरेषा व धोरण नव्याने सुधारित केले आहे. "मनुष्यबळ विकास" हे खाते नव्याने सुरू केले आहे. त्यात शिक्षण हा महत्वाचा घटक आहे. कॅबिनेट दर्जाचे अनुभवी व ज्येष्ठ मंत्री (ना. पी. व्ही. नरसिंहराव) यांच्याकडे ही जबाबदारी सोपविली. सहाव्या, सातव्या, पंचवार्षिक योजनेत हया कार्यक्रमांचा समावेश केला गेला असून करोडो रूपये यावर खर्च होत आहेत व होणार आहेत.

भारतातल्या सर्वसामान्य बहूजन समाजाच्या उत्थानाचा हा महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. पहील्या टप्प्यात १९९० पर्यन्त १५ ते ३५ वयोगटातील १० कोटी निरक्षरांना युध्द पातळीवर साक्षर करावयाचे आहे. या व्यापक स्वरूपाच्या कार्यक्रमाची कार्यवाही कशा प्रकारे चालत आहे व ती कशी असावी हा अभ्यासाचा महत्वाचा विशेष भाग होय. भारतात मोठमोठया योजना आखल्या जातात. परंतु त्या जनते पर्यन्त पोहोंचत नाहीत. केंद्र शासनाकडून येणारी प्रत्येक कल्याणकारी योजना ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्ती पर्यन्त येत असतांना अनेक अडथळे येतात. निर्माण केले जातात. जनतेच्या निरक्षरतेचा फायदा स्वार्थापोटी घेतला जातो. त्यामुळे ही योजना कशा प्रकारे राबविली जाते हे जाणून घेण्याविषयी अभ्यासकाला उत्सुकता आहे.

२ ऑक्टोबर १९७८ पासून प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम राबविला जातो आहे. यात भारतातील विद्यापीठे, प्रत्येक घटक राज्य, स्वयंसेवी संस्था, महाविद्यालये, श्रमीक विद्यापीठे, इत्यादी या कार्यक्रमात सहभागी झालेली आहेत. या सर्व बाबींचा अभ्यास आणि आढावा घेणे महत्वाचे आहे. सहभागी असलेल्या सर्व घटकामध्ये सुसंवाद असणे जरूर आहे. असा सुसंवाद असला तरच हे महत्वपूर्ण कार्य प्रभावितपणे होईल. असे नसेल तर स्वयं

नियंत्रणामुळे प्रत्येक घटक आपापल्या तंत्राने कार्यवाही करीत राहीला तर इच्छित ध्येय प्राप्तीत असंख्य अडचणी येतील. भारतातील विद्यापीठे स्वायत्त आहेत. विद्यापीठ अनुदान मंडळानेही याच तारखेला स्वतंत्र आदेश काढून हा कार्यक्रम राबविला जावा असे विद्यापीठांना कळविले. यामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रात येणा-या महाविद्यालयातील राष्ट्रीय प्रौढ शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यांच्या मार्फत हा कार्यक्रम राबविला जात आहे. म्हणजे शे वर शे आहे. त्यात तज्ञांच्या येणा-या सूचना, संकल्पना शेवटच्या घटकापर्यन्त जाणे फार महत्वाचे आहे. मध्येच कांही दोष निर्माण झाला तर, "ध" चा "मा" झाला तर, संपूर्ण संकल्पना कोसळेल. यास्तव सर्व आदेश, सूचना, संकल्पना, जशाच्या तशा शेवटच्या घटका पर्यन्त पोंहोंचल्या पाहीजेत, म्हणून संशोधनाची गरज आणि महत्व आहे, असे अभ्यासकाला वाटते.

२.२ संशोधनाचे शीर्षक :-

शोध प्रबंधासाठी अभ्यासकाने "औसा तालुक्यातील प्रौढ शिक्षण कार्यक्रम केंद्राचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडला आहे.

राष्ट्राच्या सर्वांगीण विकासातील महत्वाचा अडथळा म्हणजे निरक्षरता होय. निरक्षरता नष्ट करून साक्षर, सुसंस्कृत, सुशिक्षीत लोकसंख्या निर्माण करणे हे एक मोठे आव्हान असते. निरक्षरता व दारिद्र्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. निरक्षरता व दारिद्र्य यामुळे बहुसंख्य समाज राष्ट्रीय कार्यात परिणामकारकपणे सहभागी होवू शकत नाही. स्वतंत्र भारतात दारिद्र्य आणि निरक्षरता यामुळे बहुसंख्य समाज राष्ट्रीय कार्यात सहभागी होवू शकला नाही. विकासाच्या अनेक फायद्यापासून, योजना पासून असा समाज वंचित राहिला, दूर राहीला. लोकशाही राष्ट्रात सर्व समाजातील प्रत्येक व्यक्तीस समान संधी प्राप्त करून देणे आवश्यक असते. शिक्षणाशिवाय व्यक्तीचा सर्वांगीण विकास, पर्यायाने समाज व देशाचा विकास होवू शकणार नाही. केवळ १० वर्षांनी आपण २१ व्या शतकाकडे जाणार आहोत.

२१ व्या शतकात पदार्पण करत असतांना आपल्या देशात इ.स. १९८१ पर्यन्त ६४ टक्के (४३ कोटी) निरक्षरांची संख्या आहे. इ.स. १९५१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण १६.६ टक्के, १९६१ मध्ये २४ टक्के, १९७१ मध्ये २९.४५ टक्के, १९८१ मध्ये ३६ टक्के होते. साक्षरतेचे प्रमाण वाढत गेले तरीही निरक्षरतेचे संख्येत लक्षणीय वाढ झाली. या वाढीचे मुख्य कारण म्हणजे प्रचंड प्रमाणात वाढलेली लोक संख्या होय.[1]

अशा स्थितीत योग्य वेळी सावध राहून निरक्षरता निर्मूलनाचे कार्य जाणीवपूर्वक केले नाही तर या शतका अखेर जगामध्ये जेवढी निरक्षरांची संख्या असेल त्यापैकी निम्मे लोक भारतात असतील. म्हणून ही विसंगती नष्ट करणे आवश्यक आहे. यासाठी निरक्षर प्रौढांना साक्षर करण्याची पध्दती अधिक कार्यक्षम व प्रभावी होणे ही काळाची गरज आहे.[2] त्या दृष्टीने

---

१) डांगे चंद्रकुमार, राष्ट्रीय प्रौढ शिक्षण
प्रकाशक - गो.के.जोगळेकर, नूतन प्रकाशन, पुणे.
मुद्रक - ना.तु. कुंभार १८ डिसेंबर १९७८ प्रथम आवृत्ती
परिशिष्ठ-२, पृष्ठ क्रमांक ८८

2) Thakur Devendra,
Adult Education and Mass Literacy
Deep andDeep Publication 1988. Page No.5,6

"औसा तालुक्यातील प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या केंद्राचा चिकित्सक अभ्यास" हा विषय अभ्यासकाने निवडला आहे.

प्रौढ शिक्षणाचे उद्दिष्ट्ये :-

निरक्षर प्रौढानी शिकावे. स्वत:चा आणि परिसराचा विकास घडवून आणावा आणि अखंड शिक्षण घेणरा समाज निर्माण व्हावा हा दृष्टीकोन प्रौढ शिक्षणामागे आहे. त्या दृष्टीने प्रौढ शिक्षणाची उद्दिष्ठये पुढील प्रमाणे आहेत :-

१) जाणीव जागृती

२) कार्यात्मकता

३) साक्षरता

१) जाणीव जागृती :- "वैयक्तीक व सामाजिक जीवनामध्ये निर्माण होणारे प्रश्न, समस्या, जबाबदा-या, हक्क व कर्तव्य, या संबंधीची जाण म्हणजेच जाणीव जागृती.

व्यक्तीच्या जीवनात अनेक सामाजिक, धार्मिक, मानसिक, समस्या निर्माण होतात. अनेक जबाबदा-या त्याला पार पाडाव्या लागतात. ज्या समाजात आपण राहातो त्या समाजात अनेक प्रश्न असतात, ते प्रश्न सोडवावेत याची जाणीव, वैयक्तीक व सामाजिक प्रश्ना विषयी आणि त्यांच्या निर्मूलना संबंधी उपलब्ध असणा-या मार्गा विषयी, सावधानता म्हणजे जाणीव जागृती होय.

प्रचंड संख्येने निरक्षर असलेल्या प्रौढांच्या मनात जाणीव जागृती निर्माण झाली तरच राष्ट्राचा विकास होवू शकेल. कोठारी आयोगाने

म्हटले आहे की, "कुठलेही राष्ट्र आपल्या रक्षणाचा भार केवळ पोलिस व सैन्य यांच्यावर सोपवू शकत नाही तर स्वातंत्र्याचे रक्षण मुख्यत: त्या राष्ट्रातील सुजाण, सुज्ञ, सुशिक्षित, सावधान असणा-या नागरिकांवर अवलंबून आहे.

जाणीव जागृती करावयाची म्हणजे प्रौढांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करावयाचा. मी शिकून काय करणार? ही नकारात्मक मनस्थिती काढून, मी नवीन गोष्टी आत्मसात करेन हा विश्वास प्रौढामध्ये निर्माण करावयाचा आहे. त्यांच्या मानसिक जागृती बरोबरच शारिरीक विकासाची जागृती करावयाची आहे. स्वच्छता, व्यसनाधिनता, समतोल आहार, आरोग्य, यांची जाणीव करून द्यावयाची आहे. अंधश्रध्दा, कर्मकांड, जातीयता, यातून त्यांची मने मोकळी करावयाची आहेत. सामाजिक एकतेचा विश्वास, राष्ट्रप्रेम, आंतर राष्ट्रीय सामंजस्याची भावना, वैज्ञानिक दृष्टीकोन, उद्योगप्रियता, संयम, सेवा, त्याग इत्यादी गुणांची जाणीव करून द्यावयाची आहे.[2]

२) <u>कार्यात्मकता</u> :- प्रौढांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांच्यात, त्यांचा व्यवसायिक विकास करणे, आधुनिक शेती तंत्राची माहिती देणे, पूरक जोड धंद्याची माहिती देणे व शेतक-याचे स्वावलंबन वाढविणे इत्यादी महत्वाचे आहे. कामगारांना त्यांचे व्यावसायिक कौशल्य वाढवून अधिक उत्पादन करता येईल या दृष्टीने प्रयत्न करणे म्हणजे कार्यात्मकता वाढविणे होय. २ ऑक्टोबर १९७८ पासून अशा या साक्षरता प्रसाराचे कार्य जोराने सुरू झाले आहे.[3]

---

2. Indian Adult Education Association, New Delhi 110002 Handbook for Adult Education Instructors Series No.133 Page No.9
3. Ibid, Page No.10

३) साक्षरता :- १९८१ च्या जनगणनेनुसार भारतात ४२ कोटी ४२ लक्ष लोक निरक्षर होते. या निरक्षर लोकांना छापलेली पुस्तके वाचता येत नाहीत. समजून मतदान करता येत नाही. या बहुसंख्य लोकांना साक्षर केले पाहिजे. कारण हे लोक सामाजिक, आर्थिक प्रगतीपासून वंचित राहिल्याने राष्ट्राच्या विकासात त्यांना स्थान नाही. त्यांचा स्वत:चाही विकास नाही.

साक्षरतेमुळे व्यक्ती, लिखित ज्ञान मिळवू शकते, त्याचे मन चिकित्सक बनते. समस्या कशी सोडवावी हे त्याला समजते. विविध ज्ञान प्राप्ती करुन ती व्यक्ती सामाजिक व व्यक्तीगत मुल्यांची जोपासना करु शकते. शारिरीक देवाण घेवाण वाढते. म्हणून साक्षरतेचा प्रसार व्हावा.[४]

## २.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) प्रौढ शिक्षणाचे वर्ग ज्या ठिकाणी चालतात त्या ठिकाणच्या भौतिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) प्रौढांना उपलब्ध असणा-या सोयींचा अभ्यास करणे.

३) वर्गात उपस्थित राहणा-या प्रौढ विद्यार्थ्यांच्या अपेक्षांचा अभ्यास करणे.

---

4. Thakur Devendra, Adult education and Mass Literacy., Deep and Deep Publication, 1988. Page No.117,118

४) वर्गामध्ये प्रौढ विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्यामध्ये कोणत्या समस्या ( अडचणी ) येतात त्यांचा अभ्यास करणे.

५) प्रौढ वर्गांना शिकविणा-या शिक्षकांच्या (संघटकाच्या) अडचणींचा अभ्यास करणे आणि त्यांना उपलब्ध असलेल्या मार्गदर्शनाचा अभ्यास करणे.

६) शिक्षकांनी, संघटकांनी नवीन सुधारणा केल्या असल्यास त्यांची नोंद घेणे.

७) वर्गातील दैनंदिन कार्यक्रमांचा अभ्यास करणे.

८) वर्गाच्या कार्याचे मूल्यमापन करणे.

९) प्रौढ शिक्षण कार्यक्रमाला गती मिळावी म्हणून सूचना देणे.

२.४ <u>संशोधनाची मर्यादा व व्याप्ती :-</u>

"औसा तालुक्यातील प्रौढ शिक्षण कार्यक्रमांच्या केंद्रांचा चिकित्सक अभ्यास" या शोध प्रबंधाच्या विषयाचा अभ्यास करतांना अभ्यासकाने औसा तालुका, जिल्हा लातूर मधील प्रौढ शिक्षण केंद्रे आणि प्रौढांची निवड पुढील प्रमाणे केली आहे.

१) <u>ग्रामीण कार्यात्मक साक्षरता योजना:-</u> या योजनेव्दारे औसा तालुक्यात चालविली जाणारी इ.स. १९८८-८९ आणि १९८९-९० या दोन वर्षातील केंद्रे आणि प्रौढ निवडले.

एकाच स्त्री संघटक व पुरुष संघटक, यांचेकडे दोन वर्षे १९८८-८९ व १९८९-९० मध्ये चाललेली प्रौढ शिक्षणांची केंद्रे एकूण १० स्त्री प्रौढ शिक्षण केंद्रे, १० पुरुष प्रौढ शिक्षण केंद्रे, एकूण २० प्रौढ शिक्षण केंद्रे निवडली.

प्रत्येक केंद्रातून हजेरी पटावरील क्रमांक १० आणि २० असे दोन प्रौढ एक वर्षासाठी या प्रमाणे दोन वर्षासाठी चार स्त्री प्रौढ निवडले. एकूण निवडलेल्या स्त्री प्रौढांची संख्या ४० झाली. याच प्रकारे ४० पुरूष प्रौढांची निवड केली. एकूण ८० प्रौढ निवडले.

२) राज्य प्रौढ शिक्षण योजना :- जिल्हा प्रौढ शिक्षण विभाग जिल्हा लातूर यांचे तर्फे औसा तालुक्यात १९८९-९० मध्ये चालविली जाणारी ५ स्त्री प्रौढ शिक्षण केंद्रे आणि ५ पुरूष प्रौढ शिक्षण केंद्र निवडली. हजेरी पटावरील क्रमांक १० आणि २० चा प्रौढ या प्रकारे १० स्त्री प्रौढ, १० पुरूष प्रौढ, एकूण २० प्रौढांची निवड केली.

३) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना :- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहाय्याने, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्न महाविद्यालय तर्फे औसा तालुक्यात चालविली जाणारी प्रौढ शिक्षणाची केंद्रे, यातून ५ स्त्री प्रौढ शिक्षण केंद्रे आणि ५ पुरूष प्रौढ केंद्रे १९८९-९० मधील निवडली.

या केंद्रातील हजेरी पटावरील क्रमांक १० आणि २० या प्रौढ प्रत्येक केंद्रातून निवडला. या प्रकारे १० स्त्री प्रौढ आणि १० पुरूष प्रौढ एकूण २० प्रौढ यांची निवड केली या प्रकारे.

१) ग्रामीण कार्यात्मक साक्षरता एकूण केंद्रे २० प्रौढ ८०

२) राज्य प्रौढ शिक्षण योजना एकूण केंद्र १० प्रौढ २०

३) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण विभाग एकूण केंद्रे १० प्रौढ २०

एकूण केंद्रे ४० प्रौढ १२० निवडले.

अभ्यासासाठी निवडलेली प्रौढ शिक्षणाची सर्व केंद्रे औसा गावा पासून ३५ किलो मीटरच्या अंतरावर आहेत.

निवड केलेल्या ४० केंद्रांच्या गावाची संख्या २२ आहे.

## २.५ संशोधन विषयातील संज्ञांचा अर्थ :-

विषय :- "औसा तालुक्यातील प्रौढ शिक्षण कार्यक्रम केंद्राचा चिकित्सक अभ्यास" यातील संज्ञा:

१) प्रौढ म्हणजे :-

पूर्ण विकास झालेल्या व्यक्तीला प्रौढ म्हणतात.

१५ ते ३५ वयोगटातील व्यक्ती म्हणजे प्रौढ होय.[3]

Fully Developed and Matured.

२) शिक्षण - म्हणजे :-

तरुणांच्या विकासाची प्रक्रीया होय. या प्रक्रियेमध्ये सामाजिक स्थिती गतीचा विकास या जाणीवेच्या अंगाने मानवाने आत्मसात केलेल्या सवयी, त्याची पध्दत होय -

इंग्रजीत ( Education) शिक्षण याचा अर्थ

Education Means:-

The Process of 'bringing Up' young persons. The Manner in which a person has been brought up with reference to social station, kind of manners and habit acquired.'[4]

- Oxford Dictionary.

शिक्षण म्हणजे व्यक्तीत्वाचा सर्वांगीण विकास किंवा संपूर्ण व्यक्तीत्वाचा विकास"[५]

प्रा. कुंडले मधुकर बाळकृष्ण

३) कार्यक्रम म्हणजे :-

"उद्दिष्टाप्रत जाण्यासाठी केलेली योजना अथवा पध्दती.[६]

४) केंद्र-म्हणजे ठिकाण - जागा :-

प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे वर्ग जेथे भरविले जातात ते ठिकाण अथवा जागा म्हणजे केंद्र होय.

५) चिकीत्सक अभ्यास म्हणजे :-

तटस्थ वृत्तीने अर्थपूर्ण असा नीरक्षीर विवेकाने केलेला अभ्यास. या अभ्यासाचा त्या त्या क्षेत्रामध्ये काम करणा-याला उपयोग व्हावा.

६) संशोधन म्हणजे -

ज्ञानाच्या एखाधा शाखेत नविन तथ्ये किंवा तत्त्व शोधण्यासाठी किंवा जुनी तथ्ये किंवा तत्वे तपासण्यासाठी काळजीपूर्वक व पध्दतशीर केलेला अभ्यास म्हणजे संशोधन.[७]

७) संशोधन पध्दतीशास्त्र म्हणजे -

असे अध्ययन किंवा मूल तत्वे आहे की, ज्यात वैज्ञानिक चौकशी केली जाते. ती विविध शास्त्रांचा भाग किंवा संघटन असते.[८]

'The study of the principle's Underlying the organization ofthe various sciences and the conduct of scientific inquiry.'

८) संघटक :- प्रौढ व्यक्तीला शिकविणारी व्यक्ती म्हणजे संघटक होय.[९]

९) पर्यवेक्षक:- प्रौढ शिक्षणाची केंद्रे चालविणारे जे संघटक आहेत, त्यांना प्रेरणा देणारा, प्रभावी पध्दतीने काम करण्यास सहाय्य करणारा म्हणजे पर्यवेक्षक होय.[१०]

१०) प्रकल्प अधिकारी :-

प्रौढ शिक्षण केंद्रांच्या गटावर काम करणारा, प्रर्यवेक्षकांना सहाय्य करणारा अधिकारी तो प्रकल्प अधिकारी होय.[११]

११) जिल्हा प्रौढ शिक्षणाधिकारी :-

जिल्हा पातळीवर प्रौढ शिक्षण कार्यक्रमातील अधिकारी, महत्वाचा सूत्रधार, प्रेरणा देणारा, मार्गदर्शन करणारा, व्यवस्थापक होय.

-: संदर्भ सूची :-


१) डांगे चंद्रकुमार, १८ डिसेंबर १९७८
राष्ट्रीय प्रौढ शिक्षण पृष्ठ क्रमांक-५

२) अनौपचारिक/प्रौढ शिक्षण साधन केंद्र, भारतीय
शिक्षण संस्था, पुणे, राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना
कांही उपयुक्त टिपणें पृष्ठ क्रमांक-१६

3) Webster's New Collegiate Dictonary, 1975
Page No.17

4) The Concise Oxford English Dictonary of
Current English. 1964-Edited by H.W.Fowler
and F.G.Fowler based on The Oxford
Dictionary Fifth Edition Revised by E.Mcintosh

५) प्रा. कुंडले मधुकर बाळकृष्ण १९७३,
शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र पृष्ठ क्रमांक-९

६) Webster's New Collegiate Dictonary 1975
Page No.919, 920

७) प्रा. घाटोळे रा. ना. १९८३ समाजशास्त्रीय संशोधन
तत्व आणि पध्दती पृष्ठ क्रमांक-५

८) Jess stein, Editor in Chief, The Fandom
House Dictionary of the English Language
Page No.902.

९) डांगे चंद्रकुमार, १८ डिसेंबर १९७८.
राष्ट्रीय प्रौढ शिक्षण पृष्ठ क्रमांक-५१

१०) कित्ता पृष्ठ क्रमांक-५२

११) डागे चंद्रकुमार, १८ डिसेंबर १९७८
राष्ट्रीय प्रौढ शिक्षण पृष्ठ क्रमांक-५१